राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवारांकरिता सुरू करण्यात आलेल्या "मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना" या योजनेंतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्र. मोशियो-२०१८/प्र.क्र.६९/का-९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०८ मार्च, २०१९

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक: राअआ-२०१२/१०८/प्र.क्र.१८/का-९, दिनांक २५ जून, २०१३.
२) शासन निर्णय क्रमांक : मोशियो-२०१८/प्र.क्र.६९/का-९, दिनांक २७ जून, २०१८.

प्रस्तावना :-

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेत संधी उपलब्ध करण्याकरिता केंद्रिय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचारी संवर्ग)/बँकींग सेवा भरती इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या पूर्व तयारीसाठी आणि इयत्ता १० वी व १२ वी अनुत्तीर्ण अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विशेष शिकवणी वर्ग सुरू करण्याकरीता दि. २५ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये "मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना" कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये संदर्भीय क्र.२ च्या दिनांक २७.०६.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या शहरांमध्ये प्रशिक्षण केंद्रांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या वर्षासाठी नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती, मुंबई व ठाणे या खाजगी प्रशिक्षण संस्थाकडून अर्ज मागविण्यात आले होते. सदर अर्जाबाबत विहित पध्दतीचा अवलंब करुन पात्र संस्थांची निवड करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

"मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना" या योजनेंतर्गत राज्यातील नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती, मुंबई व ठाणे या केंद्रात उपरोक्त अभ्यासक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्याकरिता खालील नमूद केलेल्या संस्थांची निवड करण्यात येत आहे. संबंधित संस्थांना ज्या अभ्यासक्रमांतर्गत प्रशिक्षण द्यावयाचे आहे त्या अभ्यासक्रमाचे नाव व विद्यार्थ्यांची संख्या संबंधित संस्थेपुढे दर्शविण्यात आलेली आहे.

अ.क्र.	केंद्र	अभ्यासक्रम	संस्था	विद्यार्थी संख्या
१	नाशिक	केंद्रिय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (UPSC)	प्रबोधन बहुउद्देशीय संस्था संचलित स्पेक्ट्रम अॅकडमी, नाशिक	३५
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (राजपत्रित)		३५
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (अराजपत्रित)		७०

		बँकींग सेवा स्पर्धा परीक्षा	अ)प्रबोधन बहुउद्देशीय संस्था संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी, नाशिक	३०
			ब)भरारी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नाशिक	२०
		सामाईक प्रवेश परीक्षा	अ)एम.टी.एज्युकेअर लि., नाशिक	४०
			ब) युथ एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, नाशिक	४०
		इ. १० वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग.	प्रबोधन बहुउद्देशीय संस्था संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी, नाशिक	११०
		इ. १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग.		११०
२	पुणे	केंद्रिय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (UPSC)	द पुना गुजराती केळवणी मंडळ, पुणे	३५
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (राजपत्रित)	द पुना गुजराती केळवणी मंडळ, पुणे	३५
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (अराजपत्रित)	द पुना गुजराती केळवणी मंडळ, पुणे	३५
		बँकींग सेवा स्पर्धा परीक्षा	नवदिशा मागासवर्गीय बहुउद्देशीय सोसायटी, पुणे	८०
		सामाईक प्रवेश परीक्षा	महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्युकेशन, पुणे	३५
		इ. १० वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग	महर्षि वाल्मीकी कोळी समाज संचलित दिप अकॅडमी, पुणे	५०
		इ. १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग	महर्षि वाल्मीकी कोळी समाज संचलित दिप अकॅडमी, पुणे	५०
३	नागपूर	केंद्रिय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (UPSC)	प्रिमिअर अकॅडमी सोसायटी, नागपूर	३५
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (राजपत्रित)		३५
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (अराजपत्रित)	मिलिंद शिक्षण संस्था, नागपूर	७०
		बँकींग सेवा स्पर्धा परीक्षा	स्पंदन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर	४०
		सामाईक प्रवेश परीक्षा	अ)डायमंड चॅरिटेबल ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्ट, नागपूर	५०
			ब) अंजुमन हामी ए इस्लाम,नागपूर	३०

		इ. १० वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग	डायमंड चॅरिटेबल ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्ट, नागपूर	५५
		इ. १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग		५५
४	अमरावती	केंद्रिय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (UPSC)	आदर्श मल्टीपर्पज सोसायटी, अमरावती	३५
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (राजपत्रित)		३५
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (अराजपत्रित)		३५
		बँकींग सेवा स्पर्धा परीक्षा	दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर	४०
		सामाईक प्रवेश परीक्षा	एक्सेल फाऊंडेशन, अमरावती	८०
		इ. १० वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग	दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर	६०
		इ. १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग		६०
५	मुंबई	केंद्रिय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (UPSC)	प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी	४०
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (राजपत्रित)	प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी	४०
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (अराजपत्रित)	प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी	८०
		बँकींग सेवा स्पर्धा परीक्षा	प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी	७०
		सामाईक प्रवेश परीक्षा	एम.टी.एज्युकेअर लि., मुंबई	१२०
		इ. १० वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग	सिद्दीकी एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर ट्रस्ट, मुंबई	१४०
		इ. १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग		१३०
६	ठाणे	केंद्रिय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (UPSC)	प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी	४०
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (राजपत्रित)	प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी	२०
		महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा (MPSC) (अराजपत्रित)	प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी	२०

		बँकींग सेवा स्पर्धा परीक्षा	प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी	३०
		सामाईक प्रवेश परीक्षा	एम.टी.एज्युकेअर लि.,ठाणे	१००
		इ. १० वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग	अ) अपूर्वा महिला सामाजिक संस्था, ठाणे	१००
			ब) प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी**	१००
		इ. १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग	अ) अपूर्वा महिला सामाजिक संस्था, ठाणे	९०
			ब) प्रबोधन बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नाशिक संचलित स्पेक्ट्रम अकॅडमी**	९०

२. वरील प्रशिक्षण वर्गांमध्ये प्रवेशासाठी उमेदवारांकरिता पात्रतेचे सर्वसाधारण निकष व प्रशिक्षणाच्या सर्वसाधारण अटी पुढीलप्रमाणे राहतील. १) उमेदवार धार्मिक अल्पसंख्याक (मुस्लिम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख, पारसी व ज्यू) समाजातील असावा. २) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. ३) या प्रशिक्षणाचा लाभ फक्त प्रशिक्षणापुरता असेल, उमदेवारांना निवासाची व्यवस्था स्वत: करावी लागेल. ४) एकूण प्रशिक्षणार्थी उमेदवारांपैकी ३०% जागा मुलींसाठी राखीव असतील. जर प्रशिक्षणासाठी विहित केलेल्या मानकांची पूर्तता करणाऱ्या पुरेशा अल्पसंख्याक मुली उपलब्ध होऊ शकल्या नाहीत तर मुलींसाठी राखीव असलेल्या जागा संबंधित अल्पसंख्याक प्रवर्गातील मुलांमधून समायोजित करण्यात येतील.५) प्रशिक्षण योजनेसाठी उमेदवारांची निवड गुणवत्तेनुसार करण्यात येईल. मात्र समान गुण मिळाल्याच्या परिस्थितीत ज्या उमेदवारांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न कमी असेल अशा उमेदवारांना प्रशिक्षणासाठी प्राधान्य देण्यात येईल व याकरिता तहसिलदार किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.

३. या योजनेची लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना प्रत्येक प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी (लोकसेवा स्पर्धा परीक्षा/बँकींग स्पर्धा परीक्षा/सामाईक प्रवेश परीक्षा/इ. १० वी व १२ वी परीक्षा) दि. २५ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

४. या योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीकरिता निवड करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांवर खालीलप्रमाणे जबाबदाऱ्या राहतील:-

१) प्रशिक्षणासाठी अल्पसंख्यांक प्रवर्गनिहाय विहित करण्यात आलेल्या जागांनुसार उमेदवारांची यादी तयार करणे आणि या शासन निर्णयामध्ये विहित करण्यात आलेल्या तरतुदींनुसार गुणवत्तेवर आधारित व विहित उत्पन्न मर्यादेनुसार उमेदवारांची प्रशिक्षणासाठी प्राथमिकता ठरविणे. वेगवेगळया उमेदवारांकरिता विहित करण्यात आलेल्या पात्रतेच्या निकषांची पूर्तता करणाऱ्या इच्छूक उमेदवारांकडून ऑन लाईन प्रवेशाकरिता जाहिरात देणे.

२) संबंधित भरती परीक्षेकरिता विहित करण्यात आलेल्या पात्रता परीक्षेमध्ये अर्जित केलेल्या गुणांनुसार किंवा प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करणे. मात्र उमेदवारांना समान गुण मिळाल्याच्या परिस्थितीत ज्या उमेदवाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अन्य उमेदवारांच्या तुलनेत कमी असेल, त्या उमेदवारास प्रशिक्षण कार्यक्रमास प्रवेशाकरिता प्राधान्य देण्यात येईल. उमेदवारांची निवड करताना दि. २५ जून, २०१३ व दिनांक २७ जून, २०१८

च्या शासन निर्णयान्वये अल्पसंख्याक लोकसमुहासाठी विहित करण्यात आलेल्या प्रमाणकानुसार उमेदवारांची निवड करण्यात यावी.

३) एखाद्या अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास, त्याऐवजी अन्य अल्पसंख्याक लोकसमुदायातील उमेदवारास प्रवेश देण्यात यावा, एखाद्या अल्पसंख्याक लोकसमुहातील पुरेशा मुली उपलब्ध होऊ शकल्या नाहीत तर, मुलींसाठी राखीव असलेल्या जागा संबंधित अल्पसंख्याक प्रवर्गातील मुलांमधून समायोजित करण्यात येतील.

४) प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची बायोमॅट्रीक यंत्रावर हजेरी घेणे आवश्यक राहील तसेच मासिक व तिमाही अहवाल शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागास सादर करणे आवश्यक राहील.

५) प्रशिक्षित उमेदवारांचा आधारकार्ड क्रमांकासह डाटाबेस ठेवणे, उमदेवारांशी संपर्क व समन्वय ठेवणे, निवड झालेल्या उमेदवारांच्या नावांची यादी, आधार कार्ड क्रमांक व संपर्क क्रमांकासह शासनास सादर करणे व संबंधित संस्थेच्या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) ही माहिती प्रदर्शित करणे.

६) आवश्यकता असल्यास प्रसंगानुरुप उमेदवारांची चाळणी परीक्षा घेणे.

७) या योजनेअंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या या अथवा इतर योजनेअंतर्गत प्रवेश न देण्याची संस्थेने खबरदारी घेणे आवश्यक राहील. तसेच संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यास अन्य संस्थेने याच योजनेखाली प्रवेश दिलेला नाही याची देखील संबंधीत संस्थांनी खात्री करून घ्यावी.

८) निवड झालेल्या प्रशिक्षण संस्थांनी विविध अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रीया दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत पूर्ण करुन दिनांक ०१ एप्रिल, २०१९ पासून नियमितपणे प्रशिक्षण वर्ग सुरु करणे आवश्यक राहील.

९) शासन निर्णय, दिनांक २७.०६.२०१८ अन्वये, ज्या उमेदवारांनी संबंधित केंद्राचे जिल्हाधिकारी यांचेकडे सदर प्रशिक्षणासाठी अर्ज केला आहे. अशा पात्र उमेदवाराना प्राधान्याने त्या-त्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश देणे बंधनकारक राहील.

५. प्रशिक्षणार्थी उमेदवारांची प्रशिक्षण वर्गातील किमान ८५% उपस्थिती विचारात घेऊन प्रत्यक्षात परीक्षेस बसलेल्या उमेदवारांच्या प्रमाणात दि. २५ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या कालावधीसह दरानुसार व टप्पानिहाय अनुदानाचे वितरण संबंधित प्रशिक्षण संस्थांना करण्यात येईल.तथापि, अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष कालावधी कमी झाला असल्यास तेवढाच कालावधी ग्राह्य धरुन त्याप्रमाणात अनुदानाचे वितरण संबंधित प्रशिक्षण संस्थांना करण्यात येईल.

६. सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्षाचा म्हणजेच २०१९-२० साठी (केवळ १२वी करीता) राहील.

७. इयत्ता १०वी व १२वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी निवड केलेल्या संस्थांनी मार्च, २०२० मध्ये होणाऱ्या परीक्षेपर्यंत प्रशिक्षण देणे आवश्यक राहील.

८. वरील संस्थांची निवड एक वर्षासाठी म्हणजेच सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता करण्यात येत आहे. मात्र ज्या संस्थेचा निकाल ०% लागेल त्या संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०८१८१०३९७८१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.03.11 11:54:07 +05'30'

(दि.मा.सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व संबंधित संस्था (पत्राने)

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,
६. अल्पसंख्याक कल्याण समिती, विधानमंडळ, विधानभवन, मुंबई.
७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
८. महालेखापाल , १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. महासंचालक, यशदा, पुणे.
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, (प्रसिध्दीसाठी)
१२. सर्व जिल्हाधिकारी,
१३. संचालक, तंत्रशिक्षण / व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण / वैद्यकीय शिक्षण / उच्च शिक्षण / शालेय शिक्षण, संचालनालय. मुंबई / पुणे
१४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१७. सर्व मा. मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१८. सर्व मंत्रालयीन विभाग,
१९. विभागातील सर्व अधिकारी / कार्यासने,
२०. निवडनस्ती (कार्यासन-९).